पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १५३ ■ बुधवार, दि. १० डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ Email: citynewss80@gmail.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा

# भाजपला बंडखोरीची सर्वाधिक भिती

## ◆ इच्छूक उमेदवारांची संख्या सर्वाधिक

प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला :** महापालिका निवडणुकीसाठी इच्छूकांची सर्वाधिक गर्दी ही भाजपकडे आहे. तर काँग्रेसकडे देखील इच्छूकांची गर्दी असून जवळपास शंभर इच्छूकांनी उमेदवारी मिळण्याची मागणी केली आहे. काँग्रेसच्या इच्छूक उमेदवारांकडून पक्ष निधी म्हणून पाच आणि तीन हजारांच्या डीडीची मागणी होत असल्याची माहिती आहे.

महापालिका निवडणुकीत सर्वाधिक टेन्शन हे भाजप नेत्यांना आले आहे. अकोला महापालिकेत जागा ८० असून महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेस, शिंदे गटाची शिवसेना यांच्यासोबत युती झाल्यास त्या जागा कमी होतील. अशा परिस्थितीत जागा कमी आणि उमेदवारी मागणारे जास्त अशी स्थिती भाजपकडे आहे. जितके जास्त इच्छूक तितकी जास्त डोकेदूखी वरिष्ठांची होणार आहे. त्याच बरोबर तिकिट नाकारल्यानंतर तितकेच बंडखोर समोर येतील अशी भिती व्यक्त केली जात आहे. भाजपच्या तुलनेत काँग्रेसमध्ये इच्छूकांची संख्या जास्त नाही. ती शंभरावर स्थिरावली आहे. पण, काँग्रेसमध्ये उमेदवारी अर्जाचे दोनशे आणि उमेदवारी अर्ज दाखल करताना पाच हजार तीन हजार इतक्या रक्कमेचा डीडी द्यावा लागणार आहे. वंचित आणि इतर पक्षांची उमेदवारी अर्ज जमा करण्याची प्रक्रिया सुरु झाली नसल्याची माहिती असून भाजप आणि काँग्रेस मध्ये इच्छूकांची गर्दी दिसून येत आहे.

### ८० जागांसाठी ४०० इच्छूक

◆अकोला शहरात अकोला पुर्व आणि पश्चिम असे दोन भाग भाजपने विभाजले आहे. जवळपास चारशे इच्छूकांनी ८० जागांसाठी भाजपकडे अर्ज केले आहे. अशी माहिती मिळाली. त्यामुळे भाजपकडे जाणाऱ्यांचा कल जास्त आहे. भाजपची राज्यात, देशात सत्ता आहे. त्यामुळे महापालिकेत भाजपची सत्ता ही एकमेव जमेची बाजु भाजपकडे आहे. तशीच ती राष्ट्रवादी आणि शिंदे सेने कडे देखील आहे. २०१७ मध्ये भाजपची सत्ता होती. त्याची अँटी इनकम्बन्सी कायम असून त्याचा फटका भाजपला बसु शकतो काय यावर खलबत सुरु आहे. महापालिकेत सत्ता कोणाची येते याकडे सर्वांचे लक्ष असून गुरुवार, १८ डिसेंबर रोजी आचार संहिता लागू शकते. त्याच बरोबर २० जानेवारी पर्यंत महापालिकेत नवे सरकार स्थापन होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे.

## वादग्रस्त शीतल तेजवानीचे आणखी एक प्रकरण उघडकीस

प्रतिनिधी १० डिसेंबर

**पुणे :** मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात अटकेत असलेल्या शीतल तेजवानी हिचा आणखी एक कारनामा समोर आला आहे. शीतल तेजवानीची पोलीस चौकशी सुरू असताना तिचा बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूरसोबतचा एक वाद समोर आल्याने खळबळ उडाली आहे. शीतल तेजवानीविरुद्ध सतत नवनवीन प्रकरण समोर येत आहेत. आता तिने रणबीर कपूरवर तब्बल ५० लाख रुपयांच्या नुकसान भरपाईचा दावा दाखल केल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. हा वाद पुण्यातील ट्रॅम्प टॉवरमधील एका फ्लॅटच्या भाडेकराराशी संबंधित असल्याची माहिती आहे.

## गुटख्यासह सात लाख साठ हजार रुपयांचा माल जप्त



प्रतिनिधी १० डिसेंबर

**अमरावती :** दिनांक ०९.१२.२०२५ रोजी बडनेरा पोलीस स्टेशन हद्दीतील लॅंडमार्क ते अकोला टी पॉइंट रोडवरील बोथरा नर्सरी जवळ अवैधरीत्या गुटखा वाहतूक करणाऱ्या आरोपी नामे राजू शहा कदिर शहा वय ५० वर्ष रा. गदेगाठपुरा मोर्शी यास ग्हुद कारसह ताब्यात घेऊन त्यातून २,६०,०००/- रुपये किंमतीचा सुगंधित तंबाखू/ गुटखा तसेच ५,००,००० रुपये किंमतीची इंडिगो कार असा एकूण ७,६०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोस्टे बडनेरा येथे गुन्हा दाखल करीत आहोत.

## अधिवेशन अध्यक्षांचा नियमांना तुडविले जाते पायदळी!

प्रतिनिधी १० डिसेंबर

**नागपूर :** विधीमंडळातील मंत्री आणि आमदारांना शिस्त लावण्याची गरज आहे का? असा प्रश्न आता विचारला जाऊ लागला आहे. कारण गेल्या पावसाळी अधिवेशनात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड आणि आमदार गोपीचंद पडळकर समर्थकांमध्ये 'फ्री स्टाईल' हाणामारी झाल्यानंतर विधीमंडळातील एकूणचं सुरक्षेवर बोट ठेवण्यात आले होते. या घटनेनंतर आमदार मंत्री यांच्यासोबत येणाऱ्या विनापास व्यक्तींना न सोडण्याचा निर्णयही अध्यक्षांनी घेतला होता.

# आज शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अधिवेशनात घमासान

प्रतिनिधी १० डिसेंबर




**नागपूर :** राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा आज तिसरा दिवस आहे. आज शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा होणार आहे. या मुद्यावरुन विरोधक सरकारला सभागृहात आणि सभागृहाबाहेर देखील घेरण्याचा प्रयत्न करणार आहेत.

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५ अंतर्गत शासनाने एप्रिल २०२५ मध्ये मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, समृद्धी महामार्ग, न्हावाशेवा-शिवडी यांसह राज्यातील प्रमुख महामार्गांवर प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी जाहीर केली. मात्र, या निर्णयानंतरही अनेक टोल नाक्यांवर आजही सर्रासपणे टोलवसुली सुरू असल्याचा आरोप काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी केला आहे. शासनाची नियमावली अस्तित्वात असताना आणि तिचे पालन करणे बंधनकारक असताना, काही टोल ऑपरेटर दादागिरी करत असल्याचे राज्यभरातून समोर येत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक अडचणीत सापडत आहेत. टोल कर्मचारी नागरिकांशी असभ्यपणे वागत असल्याच्या तक्रारीही वाढत आहेत. अशा टोलधारकांवर कठोर दंडात्मक कारवाई करणे तर आवश्यकच आहे; परंतु शासन निर्णयाची उघडपणे पायमल्ली करणाऱ्या टोलधारकांचे टेंडर सरकार रद्द करणार का? हा प्रश्न देखील पटोले यांनी उपस्थित केला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी वेगळ्या विदर्भाच्या सुरू असलेल्या चर्चेवर पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे.



### देवेंद्र फडणवीस म्हणजे बिग डी : एकनाथ शिंदे

नागपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सावजीसारखे तिखट आणि नागपुरी संत्र्यासारखे गोड आहेत. जराही चिडचिड न करता देवेंद्र फडणवीस अंगावर येणाऱ्या विरोधकांचा करेक्ट कार्यक्रम करतात, असे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. गेल्या काही दिवसांपासून एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात एकमेकांच्या पक्षाचे कार्यकर्ते फोडण्यावरुन वितुष्ट निर्माण झाल्याच्या चर्चा आहेत. या सगळयामुळे एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत जाऊन अमित शाहांकडे महाराष्ट्र भाजपची तक्रारही केल्याचे सांगितले जात होते. या पार्श्वभूमीवर मंगळवारी नागपूरमध्ये झालेल्या कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर स्तुतीसुमने उधळून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.

# महापालिकांच्या निवडणुकीची घोषणा आठवडाभर लांबणार!

प्रतिनिधी १० डिसेंबर

**नाशिक :** राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजताच १५ डिसेंबरला महापालिका निवडणुकांची घोषणा राज्य निवडणूक आयोगाकडून केली जाईल, असे सांगण्यात येत होते. परंतु निवडणुकीची घोषणा किमान आठवडाभर लांबण्याची शक्यता आहे. प्रारूप मतदारयाद्यांवरील हरकतींच्या विक्रमी संख्येमुळे अंतिम मतदारयादी प्रसिद्धीला पाच दिवसांची मुदतवाढ देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे. आता १० ऐवजी १५ डिसेंबरला प्रभागनिहाय अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीची घोषणा डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार महापालिका निवडणुकांच्या तयारीला सुरुवात करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार प्रभागरचना तसेच प्रभागनिहाय आरक्षण निश्चित करण्यात आल्यानंतर राज्यभरातील २९ महापालिकांच्या प्रभागनिहाय मतदारयाद्या निश्चितीची प्रक्रिया सुरू आहे. २० नोव्हेंबरला प्रभागनिहाय प्रारूप मतदारयाद्या जाहीर केल्यानंतर २७ नोव्हेंबरपर्यंत हरकती सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. मात्र, हरकती दाखल करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी राजकीय पक्ष तसेच इच्छुकांकडून करण्यात आल्यानंतर हरकती दाखल करण्यासाठी ३ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

# आता 500 रुपयांच्या स्टॅम्पवर वडिलोपार्जित जमिनीची वाटणी !




प्रतिनिधी १० डिसेंबर

**सोलापूर :** वडिलोपार्जित जमीन, जागांची मुला-मुलींच्या नावे वाटणी आता अवघा ५०० रुपयांच्या स्टॅम्पवर होणार आहे. त्यासंदर्भातील शासन निर्णय अजून निघालेला नाही, पण महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तशी घोषणा केली आहे. यामुळे पाच ते ३० हजार रुपयांपर्यंत बचत होणार आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ८५ नुसार संयुक्त धारणेतील जमिनीत एकापेक्षा जास्त सहधारक असतील तर त्यांना त्यांच्या वाटणीच्या हिश्श्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करता येतो. मात्र, मालकी हक्काबाबत वाद असल्यास दिवाणी न्यायालयाचा निकाल येईपर्यंत वाटणी थांबते. आदेशानंतर वाटणीची कार्यवाही तहसीलदारांमार्फतही केली जाते. त्यासाठी एक रुपयाचे देखील शुल्क लागत नाही. याशिवाय संमतीने वडील त्यांच्या मुलांना जमीन, जागेची वाटणी देत असतील तर सध्या त्यासाठी एक-दोन टक्के स्टॅम्प ड्यूटी, नोंदणी शुल्क व २०० ते ५०० रुपयांचा स्टॅम्प पेपर लागतो. पण, महसूल विभागाच्या प्रस्तावित निर्णयानंतर कोणतेही शुल्क न भरता अवघ्या ५०० रुपयांत वडिलोपार्जित जमिनीचे हिस्से मुलांच्या नावे करता येणार आहेत.

### सध्या वाटणीपत्र, बक्षीसपत्राची पद्धत...

◆वडिलांची प्रॉपर्टी मुला-मुलींच्या नावे करण्यासाठी वाटणीपत्र, बक्षीसपत्र केले जाते. त्याअंतर्गत इतरांप्रमाणे दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन नियमित स्टॅम्प ड्यूटी भरावी लागत नाही. वडिलांच्या जमीन वाटणीसाठी एक ते तीन हजारांपर्यंत नोंदणी फी (जमिनीच्या बाजारमूल्याच्या प्रमाणात) व ५०० रुपयांचा स्टॅम्प लागतो. त्यावर प्रॉपर्टीचा हिस्सा मुलांच्या नावे करता येतो. जमिनीचा काही हिस्सा मुलीच्या किंवा बहिणीच्या नावे करताना बक्षीसपत्र करावे लागते. त्यासाठी एक टक्का स्टॅम्प ड्यूटी व २०० रुपयांचा स्टॅम्प द्यावा लागतो. वडिलांच्या नावावरील प्लॉटमधील हिस्सा मुला-मुलींच्या नावे करण्यासाठी दोन टक्के स्टॅम्प ड्यूटी द्यावी लागते. तसेच एक टक्का नोंदणी शुल्क देखील भरावे लागते.

# आरआरसीचे माझं मत हॉट टॉपिक सोशल मिडियावर हिट

प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला :** महापालिका निवडणुकीची चाहूल सर्वत्र लागली आहे. पुढच्या गुरुवारी महापालिकेची आचार संहिता लागू शकते. तीन वर्षापासून प्रशासक राज अकोल्यात आहे. असे असताना त्रस्त अकोलेकरांनी माजी नगरसेवकांबरोबर यंत्रणेवर जोरदार तोंडसुख घेतले आहे. अकोल्यातील एकमेव लोकाभिमुक न्यूज चॅनल आर आर सीच्या माझं मत आणि हॉट टॉपिकमध्ये अकोलेकरांनी स्पष्ट भुमिका मांडली.

अकोला शहरातील सुजाण नागरिक जागृत आहे. अकोलेकर त्यांच्या कर्तव्यात मागे नसून त्यांना त्यांचे हक्क माहित आहे. आर आर सी ने नेहमीच अकोलेकरांचा आवाज यंत्रणेपर्यंत, राजकारण्यांपर्यत आणि सरकार पर्यंत पोहचविला आहे. महापालिका निवडणुकांची चाहुल लागताच अकोलेकरांचे मुळ मुद्दे काय आहे त्याची चाचपणी आर आर सी करत आहे.यासाठी माझं मत, हॉट टॉपिक सोबत आवाज जनतेचा या माध्यमातून अकोलेकरांचा आवाज आर आर सी ने बुलंद केला आहे. सोशल मिडियावर आर आर सी च्या या लोकाभिमुख कार्यक्रमावर हजारो लाईक आणि शेकडो कॉमेंट पडत असून अकोलेकरांनी इंस्टाग्राम, फेसबुक आणि यु ट्युबवर अकोलेकरांच्या मतांचा आदर केला आहे. तुम्ही पण जनतेच्या प्रतिक्रिया आर आर सी च्या सोशल मिडिया अकाउंटवर भेट देत पाहू शकता.त्याच बरोबर आपण ही आपल्या प्रतिक्रिया आर आर सी कडे पाठवू शकता.




“ नगरसेवक म्हणजे खोट्यांचा बाजार आहे. अकोल्यात धुल्ला इतका आहे की, पोरांना लग्नासाठी पोरी मिळत नाही. असा दावा डाबकी रोडी येथील गृहस्थाने केला आहे.




“ डाबकी रोडवरुन सिटी बस कशी जाईल असा प्रश्न युवकांना पडला आहे. साधा ट्रक्टर जात नाही तर सिटी बस कशी जाईल. अरुंद रोडचा विस्तार केला पण, अपुर्ण कामाचा रोज नागरिकांना फटका बसत आहे.



“ डाबकी रोड तर इतका खराब आहे की रोज दोन तीन लोक पडतात. त्याला काही चॅलेंज नाही. पावसाळयात डबके साचते. त्या डबक्यात आता धुळ साचली आहे. पावडरचे कामच नाही.

# भाजपाने श्रेय घेणे का टाळले

## ◆ मनपाच्या मालमत्ता करवाढीवर सुप्रीम कोर्टाचे शिक्कामोर्तब!

प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला :** महापालिका मालमत्ता करवाढीला विरोध करणारे काँग्रेस नेते सर्वोच्च न्यायालयात हारले. पण, मालमत्ता करवाढीचे श्रेय घेण्याचे धाडस अकोल्यातील भाजपाने दाखविले नाही. त्यामुळे जनतेवरचा वाढलेला बोजा कायम झाला असून मनपा इलेक्शन मध्ये हा मुदद हॉट टॉपिक ठरणार आहे. भाजप सत्ताकाळात मालमत्ता करवाढ लागू झाली होती. त्या विषयीचे भाजपने श्रेय घेणे टाळणे म्हणजे मालमत्ता करवाढ चुकीली होती काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. अकोला महानगरपालिकेने लागू केलेल्या मालमत्ता करवाढीला अखेर सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखवला आहे. या निर्णयामुळे करवाढीला स्थगिती देणारा उच्च न्यायालयाचा आदेश रद्द झाला असून, मनपाने केलेली करवाढ आता कायम राहणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने ८ डिसेंबर २०२५ रोजी याबाबतचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. गेल्या ८-९ वर्षांपासून न्यायप्रविष्ट असलेल्या या मालमत्ता करवाढ प्रकरणी मनपाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने यावर सुनावणी पूर्ण करून सोमवारी निकाल दिला. खंडपीठाने २०१९ मध्ये करवाढीला स्थगिती देणारा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा निर्णय रद्द केला. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या २२ पानी निर्णयात काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली आहेत. न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपावर तीव्र आक्षेप घेतला. 'कराचे दर निश्चित करणे किंवा सुधारित करणे हा महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील आर्थिक धोरणाचा भाग आहे,' असे न्यायालयाने स्पष्ट केले. काँग्रेसचे माजी नगरसेवक डॉ. जिशान हुसेन यांनी मनपाने २०१७ मध्ये पुढील पाच वर्षांसाठी प्रस्तावित केलेल्या मालमत्ता करवाढीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिकेद्वारे आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने ९ ऑक्टोबर २०१९ रोजी करवाढ रद्द करण्याचा निर्णय दिला होता. उच्च न्यायालयाचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला.

# अकोटला महिलेची आत्महत्या नसून गळा आवळून हत्या!

### पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांची पत्रकार परिषदेत माहिती

वि प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोट :** अकोट शहरातील महेश कॉलनी येथे आरोपी पवन लक्ष्मण इंगळे याने त्याच्यासोबत मागील काही दिवसांपासून राहत असलेल्या महिलेचा गळा आवळून हत्या केल्याची घटना घडली. ७ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजेदरम्यान आरोपी पवन इंगळे याने पोलिस स्टेशनला येऊन एका महिलेने त्याच्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली, अशी माहिती दिली. मात्र शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार अमोल माळवे, पोउनि नीलेश बाराहाते, एएसआय अनिल वक्टे व पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करून महिलेचा मृतदेह अकोट ग्रामीण रुग्णालयात आणल्यानंतर प्रथम आकस्मिक मृत्यूची नोंद केली. मात्र आरोपीचा बनाव पोलिसांनी उघड करून खुनाचा उलगडा झाल्याचे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. ८ डिसेंबरला पोलिसांनी कसोशीने तपास केला असता पवन लक्ष्मण इंगळे याने महिलेच्या आत्महत्येचा बनाव केला असल्याचे निष्पन्न झाले. विचारपूस केली असता त्याने महिलेचा गळा आवळून खून केल्याची कबुली दिली. या प्रकरणी मृतक महिलेच्या भावाच्या बयानावरून कलम १०३ (१) भारतीय न्यायसंहिता प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेण्यात आला व आरोपी पवन इंगळे (२७) रा. महेश कॉलनी अकोट यास अटक करण्यात आली.



पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी अकोट शहर पोलिस स्टेशनला पत्रकार परिषदेत आरोपीचा बनाव पोलिसांनी उघड करून खुनाचा उलगडा झाल्याचे सांगितले. ही कामगिरी पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अमोल माळवे, पोलिस उपनिरीक्षक नीलेश बारहाते, वैभव तायडे, अनिल वक्टे, नंदकिशोर कुलट, विपुल सोळंके, विशाल दारोकार, चालक संदीप तायडे, सुरेश माकोडे यांनी केली.

# राज्यात थंडीचा कडाका वाढला!



प्रतिनिधी १० डिसेंबर

**मुंबई :** देशभरासह राज्यातही थंडीचा कडाका वाढला आहे. उत्तरेकडील थंडीमुळे देशात गारठा वाढला आहे. याचाच परिणम महाराष्ट्रात झाला आहे. उत्तरेकडील भागात कडाक्याची थंडी असल्याने त्याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रही गारठला आहे.

राज्यात थंडीची लाट आली आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमान १० अंश सेल्सिअसच्या खाली गेलं आहे. भारतीय हवामान विभागाने राज्यात थंडीचा यलो अलर्ट जारी केला आहे. पुढील काही दिवसांसाठी थंडीची ही लाट कायम राहणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे.

गेल्या २४ तासांत शहरातील किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, पुढील तीन ते चार दिवसांत किमान तापमानात आणखी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही दिवस थंडीचा कडाका कायम राहील असा अंदाज आहे. सध्या पुण्यात तापमानाचा पारा ८.९ अंशांवर पोहोचला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट अकोला
बुधवार, दि. १० डिसेंबर २०२५

## मुख्य रस्त्यांच्या डागडूजीकडे दुर्लक्ष

**अकोला :** शहरातील मुख्य रस्त्यांची अवस्था चांगली नाही. ठिकठिकाणी खड्डे पडलेले दिसतात परंतु महापालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे याकडे दुर्लक्ष झालेले दिसते. रस्त्यांची कामे तातडीने करण्यात यावी ही मागणी नागरिक करीत आहे. आचार संहितेचा बागुलबुवा करुन दैनंदिन समस्या सोडविण्याकडे दुर्लक्ष होवू नये असे बोलले जात आहे.

## स्वातंत्र्य सेनानी स्व. ओंकार आप्पा वीर यांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यार्थिनींना सायकल वाटप



प्रतिनिधी १० डिसेंबर

**आलेगाव :** येथील नूतन विद्यालयात आलेगाव एज्युकेशन सोसायटीचे आद्य संस्थापक स्वातंत्र्य सेनानी स्व. ओंकारआप्पा वीर यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यालयातील गरजू विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आले. विद्यालयाचे अध्यक्ष व संचालक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महादेव आप्पा रामकृष्ण आप्पा वीर होते. प्रमुख पाहुणे नानासाहेब देशमुख, विजयआप्पा वीर व मुख्याध्यापक राठोड होते. प्रा. निलेश सरप यांनी ओंकार आप्पा वीर यांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील अनेक गड किल्ल्यांच्या प्रतिकृतींची निर्मिती केली. त्यामधील उत्कृष्ट कलाकृतींचा पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रम आयोजक थोरात यांच्याद्वारे देण्यात आले. विद्यार्थिनींना मानव विकास मिशन अंतर्गत मिळणाऱ्या सायकली सोपवण्यात आल्या. सायकल प्राप्त झाल्यामुळे आम्हाला विद्यालयात येणे सोपे होणार आहे याकरता मानव विकास मिशन, संचालक मंडळ प्राचार्य व शिक्षक वृंदांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अरुण खैरे यांनी केले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डॉ.मांगूळकर यांनी केले.

## वाढत्या थंडीमुळे जनजीवन प्रभावित

प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला:** वाढत्या थंडीमुळे अकोला शहरासह जिल्ह्याचे जनजीवन प्रभावित झालेले दिसते. सध्या पारा खाली आल्यामुळे मानवी आरोग्य तसेच पिकांवरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे. तुरीच्या शेंगा झडत आहे. आणखी काही दिवस थंडीचा कहर राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. परंतु सकाळी शाळेत जाणारी लहान मुले, वृद्ध तसेच रुग्णांना वाढत्या थंडीचा त्रास होत आहे. त्यापासून बचावासाठी विविध उपाय योजले जात आहेत. शहरी तसेच ग्रामीण भागात शेकोट्या पेटलेल्या दिसतात. सकाळी दहा वाजेपर्यंत देखील थंडी जाणवते. रात्रीचे तापमान कमी झाल्यामुळे लोकांची गैरसोय होत आहे.

## अकोल्यातील तीन मुले बेपत्ता

प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला :** रामदासपेठ पोलिस स्टेशन हद्दीतील रहिवासी आशिष सतीश मुरई (१५) रा. चवरे प्लॉट आणि सिटी कोतवाली पोलिस स्टेशन हद्दीतील रहिवासी आदित्य सदानंद सुगंधी (१५) रा. न्यू राधाकिसन प्लॉट आणि दर्शन राजू रंधिरे (१५) रा. सावतराम बगिचा चाळ हे काल रात्रीपासून बेपत्ता आहेत. मित्रांच्या वाढदिवसाला जातो म्हणून ते घरून निघाल्याची माहिती आहे. बालकांच्या घरच्यांनी त्यांच्या नातेवाइकांकडे चौकशी केली, परंतु ते मिळून आले नाही तसेच त्यांचा मध्यवर्ती बसस्थानक, जुने बसस्थानक व अकोला रेल्वे स्टेशन येथे शोध घेतला परंतु सापडले नाही. त्यामुळे बेपत्ता बालकांच्या नातेवाइकांनी रामदासपेठ आणि सिटी कोतवाली पोलिस स्टेशन येथे धाव घेतली असून, याप्रकरणी पोलिसांनी मीसिंगचा गुन्हा नोंद करून तीनही बेपत्ता बालकांचा युध्दस्तरावर शोध सुरू केला आहे.

# गोवंश चोरी करणारे तीन आरोपी जेरबंद

वि.प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोट :** गोवंश चोरी प्रकरणी अकोट शहर पोलिसांनी कारवाई करून तीन आरोपींना अटक केली. २ लाख १२ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

६ डिसेंबर रोजी नंदी पेठेतील फिर्यादी अनंत शालीकराम दिडोंकार यांनी त्यांच्या गायवाड्या समोर बांधलेली तीन जनावरे धामणी रंगाचा गो-हा व दोन गायी शेतातून आल्यावर गायब दिसल्या. ८ डिसेंबर रोजी दिलेल्या तक्रारीवरून अकोट शहर पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा नोंदवण्यात आला. तपासा दरम्यान डी.बी. पथकाला माहिती मिळाली की चोरीस गेलेला गो-हा कालवाडी रोडने टाटा एस वाहनातून अकोटमध्ये आणला जात आहे. त्यानुसार एमएच १२ एसएफ ९२८० क्रमांकाचे वाहन अडविण्यात आले. आणि चोरीचा उलगडा झाला.



या प्रकरणात अक्षय अरुण हिंगणकर, सुरज बाबाराव नेवरकर, प्रेम दर्शन सरकटे रा. अकोट या तिघांना अटक केली. त्यांच्याकडून ?१२,०००/- किमतीचा बैल, तसेच ?२,००,०००/- किमतीची टाटा एस गाडी, असा एकूण ?२,१२,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जनावर ताब्यात घेऊन कारवाई करण्यात आली.

**शहर पोलीसांची कामगिरी**

पोलिस निरीक्षक अमोल माळवे, डि.बी. पथक इंचार्ज उपनिरीक्षक वैभव तायडे, गणेश सोळंके, विपुल सोळंके, मोहन दुर्गे व अश्विन चौव्हाण यांनी कारवाई केली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला :** भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जाजू नगर रोड येथील सावित्रीबाई फुले विकास मंडळ महिला व रहिवासी यांनी अभिवादन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मेणबत्त्या प्रज्वलित करण्यात आल्या होत्या. कार्यक्रमाला महिला, युवती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने कार्यक्रम साजरा झाला.

## सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर जयंती व सत्कार समारंभाचे आयोजन

प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला :** भारतीय बौद्ध महासभा महानगर पूर्व अकोला च्या वतीने भारतीय बौद्ध महासभेचे दुसरे राष्ट्रीय अध्यक्ष ,चैत्यभूमीचे शिल्पकार दिवंगत भैयासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित केला आहे. आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमे पर्यंत शहरात वर्षवास काळात बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित विज्ञाननिष्ठ पवित्र बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ पठण करण्यात आला. अशा सर्व ग्रंथवाचकाचा सत्कार व बौद्धाचार्यांचा सत्कार १२ ला दुपारी १२:०० वाजता अशोक वाटिका येथे आयोजिला आहे .

या कार्यक्रमाचे उदघाटक पी.जे. वानखडे सर भारतीय बौद्ध महासभा जिल्हा अध्यक्ष हे करणार , या कार्यक्रमाचे अध्यक्ष गोरखनाथ वानखडे भारतीय बौद्ध महासभा महानगर (पूर्व) अध्यक्ष हे राहणार. प्रमुख मार्गदर्शक नंदकुमार डोंगरे भारतीय बौद्ध महासभा जिल्हा महासचिव , विजय जाधव भारतीय बौद्ध महासभा जिल्हा कोषाध्यक्ष , सुनंदाताई तेलगोटे भारतीय बौद्ध महासभा राज्य संघटिका हे करणार. प्रमुख उपस्थिती डी.एस.ननीर संस्कार विभाग प्रमुख भारतीय बौद्ध महासभा , राहुल अहिरे प्रचार प्रसार विभाग प्रमुख भारतीय बौद्ध महासभा विजय हिवराळे संरक्षण विभाग प्रमुख भारतीय बौद्ध महासभा हे राहणार. प्रमुख पाहुणे रमेश गुरुजी गवई भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संघटक, सुखदेवराव दामोदर भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संघटक , पंचशील गजघाटे संस्कार विभाग सचिव , राहुल गोटे प्रचार प्रसार व पर्यटन विभाग सचिव , सदाशिव मेश्राम कार्यालयीन सचिव , इंदुताई मेश्राम भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हाध्यक्षा , प्रज्ञाताई इंगळे भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हा सरचिटणीस , सिंधुताई शेगावकर भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हा कोषाध्यक्ष ,वैशालीताई गोटे भारतीय बौद्ध महासभा महिला संस्कार विभाग प्रमुख , वैशालीताई वाहुरवाघ भारतीय बौद्ध महासभा महिला महानगर अध्यक्षा, संतोष रायबोले भारतीय बौद्ध महासभा महानगर पूर्व महासचिव, देवानंद पाटील भारतीय बौद्ध महासभा संस्कार विभाग उपाध्यक्ष, डी.बी. शेगावकर भारतीय बौद्ध महासभा महानगर (पूर्व) कोषाध्यक्ष उपस्थित राहतील.

महानगरा मधील सर्व उपासक उपासिकानी शेकडोच्या संख्येने सवानी उपस्थित राहावे असे आव्हान प्रचार व प्रसार विभाग भारतीय बौद्ध महासभा महानगर पूर्व चे सचिव तथा बौद्धाचार्य डॉ. ज्ञा.वा.गवई यांनी ऐका पत्रकाद्वारे कळविण्यात आले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना रांगोळीतून अभिवादन

प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला :** स्थानिक पंचशील नगर वाशीम बायपास रोडवर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण



दिनानिमित्त त्यांना अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. इयत्ता दहावीत असलेल्या कर्तव्य विजय टोम्पे याने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची रांगोळी काढून त्यांना अभिवादन केले. रांगोळीतून त्याने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आदरांजली दिली. यावेळी परिसरातील युवक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## निधन वार्ता

### कमलकिशोर भरगड

**अकोला:** खोलेश्वर मधील रहिवासी कमला रेस्टॉरंटचे



संचालक कमलकिशोर बोदुलाल भरगड ७५, यांचे ९ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुली, १ मुलगा, दोन भाऊ असा परिवार आहे. १० डिसेंबर रोजी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अकोल्याचे प्रती धर्मेंद्र म्हणून त्यांची ओळख होती. गरीबी हटाव चित्रपटात त्यांनी भूमिका केली होती. माजी महापौर मदन भरगड यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

## शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अकोल्यात मोफत वैद्यकीय तपासणी व उपचार शिबिर

प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने पक्षाचे मार्गदर्शक व देशातील ज्येष्ठ नेते पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अकोला शहरात मोफत वैद्यकीय तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत के.एम.टी. हॉल, सुभाष रोड, अकोला येथे आयोजित करण्यात येणार आहे. समाजातील गरीब, गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत मोफत वैद्यकीय सेवा, तपासण्या व आवश्यक उपचार उपलब्ध करून देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे. शिबिरामध्ये फिजिशियन, सर्जन, हृदयरोग तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ तसेच स्त्रीरोग तज्ज्ञ यांच्या सेवा उपलब्ध राहणार आहेत. तसेच हिमोग्लोबिन, ब्लड शुगर, सीबीसी,



केएफटी, एलएफटी, एचआयव्ही, एचबीए१सी यांसह आवश्यक रक्त तपासण्या मोफत करण्यात येणार असून गरजू रुग्णांना आवश्यक औषधांचाही पुरवठा केला जाणार आहे. या मोफत वैद्यकीय शिबिराचा जास्तीत जास्त लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन प्रदेश संघटक सचिव जावेद ज़करिया तसेच रफीक सिद्दीकी (अकोला महानगर अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार) यांनी शहरवासियांना केले आहे.

## संत संताजी जगनाडे महाराज जयंती साजरी



प्रतिनिधी १० डिसेंबर

**मूर्तिजापूर :** येथील पंच बंगला तेलीपुरा येथे तेली समाजाचे आराध्य दैवत संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती तेली समाजाच्या वतीने सोमवारी उत्साहात साजरी करण्यात आली. त्याच बरोबर संताजी जगनाडे महाराज सभागृह येथे संताजी सेनेच्या वतीने संताजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी दत्तात्रय कपिले यांनी संताजी महाराज यांच्या जीवन चरित्र्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला संताजी सेना तालुकाध्यक्ष सुमीत सोनोने, राहुल गुल्हाने, मुकुंद गुल्हाने, किशोर सोनोने, स्वप्नील बनारसे, सविनय गुल्हाने, योगेश आगाशे, ॲड. निलेश सुखसोहळे, रामा हजारे, संजय गुप्ता, गजानन गुल्हाने, सुमीत हजारे, मंगेश अजमिरे, शुभम हजारे, सचिन गुल्हाने, रवी हजारे, अंकुश शिरभाते, रवी हरणे, ओम हांडे, पंकज डहाणे, व्यकटेश पळसोकर तेली समाज बांधवासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## उर्जापर्वची आदिवासी बंधूंना मायेची उब



प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला:** येथील उर्जापर्व फाउंडेशनच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबवल्या जात असतात. यापैकी एक म्हणजे ठमाणुसकीची साथ,मायेची उबठच्या माध्यमातून दुर्गम भागातील आदिवासी बंधूंना कडक्याच्या थंडीत कापड व वस्तूंचे वितरण करण्यात येते. यावेळी जळगाव जामोद तालुक्यातील गोमाल आदिवासी पाड्यावर हा उपक्रम राबवण्यात आला.

या उपक्रमासाठी कृष्णराव देशमुख, विनायक कवीश्वर, किसनराव बोरे गुरुजी, प्रा.डॉ.निशिकांत देशपांडे, प्रा.डॉ. संतोष कुलकर्णी, सुरेखा सरोदे,नरेंद्र पाथरीकर,तेजराव धुमाळे, प्रा. पद्माकर उमाळे आदींनी मदत केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उर्जापर्व फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. संजय पाटील तिकांडे, सरपंच जुमानसिंग बामन्या,गजानन इचे, शुभम बोंडगावकर, नरेंद्र पाथरीकर अरुण कावस्कर, गणेश भरणे,बाळाभाऊ खडसे,अमोल कोल्हे, राहुल इंगळे,सुनील जाधव, श्रीकृष्ण सावदेकर, श्रीकृष्ण तायडे, अरुण लाहोडकर, प्रमोद ठोंबरे, अमोल धोत्रे,जगदीश वाघ, नोमान खान, गणेश सांगडे,हेमंत टाले आदींनी परिश्रम घेतले.

## समर्थ पब्लिक स्कूल मधील खेळाडुंची राष्ट्रीय सॉफ्टबॉल, कराटे आणि ॲथलेटिक्स मध्ये गगनभरारी

प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला :** श्री समर्थ पब्लिक स्कूल मधील खेळाडुंनी विविध खेळांमध्ये राज्य नव्हे तर राष्ट्रीयस्तरावर यश संपादन केले. नागपूर येथे शालेय राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धा २७ व २८ नोव्हेंबर २०२५ ला पार पडल्या. यामध्ये १७ वर्ष वयोगटात श्री समर्थ पब्लिक स्कूलची विद्यार्थीनी मृणाली गोपाल गाढे हिने बाजी मारुन छत्तीसगढ़ येथे होणा-या शालेय राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे.

तसेच नंदीनी संघपाल तायडे हिने ॲथलेक्टिक मध्ये १४ वर्षा आतील मुलींच्या गटात उंच उडी प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकावले व आपले स्थान राष्ट्रीय स्थरावर निश्चित केले. आराध्या




नंदकिशोर चिंचोलकर हिने राज्यस्तरीय कराटे ग्रुप ऑफ असोसिएशन स्पर्धे मध्ये भाग घेउन ४५ ते ४८ वजन मुलींच्या गटात सुवर्ण पदक प्राप्त करीत राष्ट्रीय स्थरावर आपले स्थान निश्चित केले.

मृणाल, नंदिनी आणि आराध्या यांची जिद्द, चिकाटी. सततचा सराव, अभ्यास तसेच खेळ या सर्वाचे संतुलन राखून त्यांनी आपले व शाळेचे नाव रोशन केले. त्यांच्या या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट व जिल्हा क्रीडा कार्यालय येथील सहकारी वर्ग यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत चमकदार कामगिरी केल्याबद्दल विजेत्या खेळाडूंचे कौतुक केले.

श्री समर्थ शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ चे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे, उपाध्यक्ष श्री. राजेश बाठे, कोषाध्यक्षा सौ. जयश्री नितीन बाठे, सहसचिव प्रा. किशोर कोरपे तसेच श्री किशोर रत्नपारखी श्री. योगेश जोशी व शाळेच्या प्राचार्या सौ. सुवर्णा गुप्ता व आई वडील यांनी विजयी खेळाडूंना पुष्पगुच्छ देवून कौतूक केले. तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांना वेळोवेळी शाळेतील क्रीडा शिक्षक मनिषा खंडेझोड, सुरज इंगळे व वैष्णवी निकोरे यांनी मार्गदर्शन दिले. तसेच शाळेतील शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

## 'प्रभात'चे १० विद्यार्थी योग स्पर्धेत विभागस्तरावर

प्रतिनिधी १० डिसेंबर

**अकोला :** प्रभात किड्स स्कूलच्या दहा खेळाडूंनी जिल्हास्तरीय योगा स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन केल्याने त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय योगा स्पर्धेचे आयोजन स्काऊड गाईड कार्यालय, अकोला येथे संपन्न झाले.



अकोला येथे झालेल्या जिल्हास्तरीय सर्वसाधारण योगासन स्पर्धेत १४ वर्षाआतील मुलीमध्ये सोयरा अंधारे, १७ वर्षाआतील मुलींमध्ये स्नेहल वानखडे व १९ वर्षाआतील मुलींमध्ये स्वरा गणोदे ह्यांनी प्रथम क्रमांक मिळविला. तर एकल कलात्मक योगासन स्पर्धेत १४ वर्षाआतील मुलींमध्ये आराध्या घुगे, १७ वर्षाआतील मुलींमध्ये स्वरा चक्रनारायण ह्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. दुहेरी कलात्मक योगासन स्पर्धेत १४ वर्षामध्ये सोयरा अंधारे,अराध्या घुगे व १७ वर्षामध्ये स्वरा चक्रनारायण, परिधी चुंगडे आणि १९ वर्षामध्ये प्रणिशा अग्रवाल व अन्वी पटेल ह्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच तालात्मक योगासन स्पर्धेत १४ वर्षामध्ये सोयरा अंधारे व आराध्या घुगे, १७ वर्षामध्ये गार्गी ताले, लावण्या ओळंबे तसेच १९ वर्षामध्ये अन्वी पटेल व प्रणिशा अग्रवाल ह्यांनी प्रथम क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन करून विभागस्तरावर झेप घेतली. विजयी खेळाडूंना प्रभातच्या योगा प्रशिक्षक मयुरी इंगळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रभातच्या प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ, क्रीडा विभाग प्रमुख स्वप्निल मांदाळे व उप विभागप्रमुख आशिष बेलोकार यांच्यासह शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी खेळाडूंचे कौतुक केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १० डिसेंबर २०२५

## पाटापांगरा जंगलात आढळला जळालेला मृतदेह

प्रतिनिधी १० डिसेंबर

**घाटंजी :** पाटापांगरा जंगल परिसरात सोमवारी दुपारी शिरोली येथील त्र्यंबक निकम (६५) यांचा अर्धवट जळालेल्या अवस्थेतील मृतदेह झाडाला लटकवलेल्या स्थितीत आढळून आला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. माहिती मिळताच पारवा ठाणेदार हेमंत चौधरी पथकासह धाव घेतली. यांनी तत्काळ पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. घटनास्थळाची पाहणी व प्राथमिक तपासातून ही घटना आत्महत्येची असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र मृत्यूचे नेमके कारण पोस्टमार्टम अहवालानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतरच तपास होणार आहे.

# कुंभारपुऱ्यातील दुकानावर धाड; मांजा जप्त

### दुकानदार फरार;यवतमाळ डिबी पथकाची कारवाई

प्रतिनिधी १० डिसेंबर

**यवतमाळ :** महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या नायलॉन,चायना मांजा विक्री, साठवणूक आणि उत्पादनावर कठोर बंदी घालली आहे. मात्र शहरात अनेक ठिकाणी मांजाची विक्री होत आहे. यवतमाळ शहर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रगटीकरण पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे कळंब चौक, कुंभारपुरा येथे मोहम्मद शहेबाज शेख सत्तार यांच्या 'शिफा किराणा' दुकानावर धाड टाकली. यावेळी पोलिसांना पाहून दुकानदार पळून गेला.



शहर पोलिसांनी पंचासमक्ष दुकाणाची तपासणी केली असता, पांढ्या रंगाच्या पोत्यात MONO KTC आणि MONO KITE लेबल असलेले १२ बंडल नायलॉन मांजा जप्त करण्यात आले. जप्तीचा एकूण महसूल अंदाजे ३,६०० रुपये आहे. पंचनामा करून आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन यवतमाळ शहरात भादंवि कलम २२३, २९३ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ७ व १७ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मिलिंद सरकटे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली. पथकात पोउपनि गणेश सपकाळ, पोहवा रावसाहेब शेंडे, प्रदीप नाईवाडे, किरण पडघन, पोलीस अंमलदार प्रदीप कुरडकर, गौरव ठाकरे, पवन नांदेकर, अभीषेक वानखडे आणि प्रतिक नेवरे सहभागी होते.

IMPACT

**माहिती देण्याचे आवाहन**

शासनाच्या आदेशानुसार यवतमाळ जिल्ह्यात नायलॉन मांजा तयार करणे, विक्री, साठवणूक किंवा पतंग उडवण्यासाठी ठेवणे गुन्हा आहे. नायलॉन मांजा अविघटनशील असल्यामुळे हे मानव आणि पशु पक्ष्यांसाठी जीवघेणे असते, माती आणि पाण्याच्या गुणवत्तेला धोका पोहोचवते व पर्यावरणाचे नुकसान करते. यासाठी नागरिकांनी यवतमाळ जिल्ह्यात कुठेही प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक किंवा उत्पादन होत असल्याचे आढळल्यास तात्काळ पोलीसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलीसांनी केले आहे.


सिटी न्यूज यवतमाळ
सोमवार, दि. ८ डिसेंबर २०२५
>> मेनलाईनसह आर्णी मार्गावरील परिसर केंद्रबिंदू; बंटीसह साथीदारांचे शहरात नेटवर्क
चायनीज मांजाची खुलेआम विक्री
पतंगीचा धागा जिवघेणा ठरतोय!
बाभूळगाव येथून दोन लाखांचा ऐवज लंपास
पत्रकार थोडक्यात बचावले

सिटी न्यूज यवतमाळ
मंगळवार, दि. ०९ डिसेंबर २०२५
यवतमाळ जिल्ह्यात नायलॉन मांजावर कायमस्वरूपी बंदी
विक्री, साठवणूक व वापरावर बंदी, उल्लंघन केल्यास शिक्षा
'सिटी न्यूज सुपरफास्ट'ने वेधले होते लक्ष
अखेर मांजा विक्रेता 'बंटी'च्या आवळल्या मुसक्या
एलसीबीची कारवाई, हजारोचा मुद्देमाल जप्त
IMPACT
जिल्हाधिकारी विकास मीना यांनी काढले आदेश

## 'गोगो'ने केली आईच्या मदतीने चोरी

प्रतिनिधी १० डिसेंबर

### लग्णासाठी खरेदी केलेले सोन्याचे दागिने लंपास

**यवतमाळ :** बाभुळगाव शहरातील सस्तंग नगरमध्ये एका घरात लग्नाची तयारी सुरू असताना घडलेली चोरीने गावकऱ्यांना धक्का दिला आहे. लग्नासाठी खरेदी केलेले सोण्याचे दागिने व १ लाख २७ हजार रुपये रोख असा एकुण २ लाख ३८ हजार रुपयाचा मुद्देमाल लंपास केला. बाभुळगाव पोलिसांनी तपासचक्रे फिरवुन गागो नामक मजुरासह त्याच्या आईला अटक केली.

आदित्य ऊर्फ गोगो दिलीप सिडाम वय २२ वर्ष, रुपाली दिलीप सिडाम वय ५० वर्ष रा. शिवाजी चौक, बाभुळगांव अशी आरोपींची नावे आहे. फिर्यादी राजु वसंतराव नवाडे (५९) यांच्या मुलाचे लग्न असल्याने घराची रंगरंगोटी व फर्निचर दुरुस्ती सुरु होती. रोज मजुर येत असल्यामुळे घरातील खोल्या खुल्या होत्या. ६ डिसेंबर रोजी रात्री घराला रंग



लावण्यात आला. या धामधुमित घराचा मागील दरवाजा बंद करणे विसरल्यामुळे घर अनलॉक राहिले. सकाळी ७ डिसेंबर रोजी कामवाली बाईने डायनिंग हॉलमधील पेटी गायब असल्याचे लक्षात घेतले. पेटीत १ लाख, १२ हजार, १५ हजार रोख तसेच सोन्याचे मंगळसूत्र ४५ ग्रॅम, सोन्याची अंगठी ५ ग्रॅम, सोन्याचे डोरे ४ ग्रॅम, चांदीची वाटी व करंडा होते. एकूण २,३८,००० किंमतीचे दागिणे गायब झाले होते. यामध्ये नववधूच्या लग्नासाठी ठेवलेले दागिनेही होते. पोलीस तपासात आरोपी आदित्य उर्फ गोगो दिलीप सिडाम (२२) हा घरातील मजुर असून त्याने आपली आई रुपाली दिलीप सिडाम (५०) याच्या मदतीने चोरी केली असल्याचे उघड झाले. विचारपूसीत दोघांनी चोरीची कबुली दिली. पोलिसांनी २,२५,५०० रुपये किंमतीचा मुद्येमाल हस्तगत केला आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे, सहा. पो.नि. रोहित बेंबरे, अंमलदार दिपक आसकर, विजय लोखंडे, निलेश भुसे, मंगेश कळसकर, सुरज गजभिये, भुषण गिरे यांनी ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली. ही घटना गावकऱ्यांसाठी धक्कादायक ठरली असून, पोलिसांच्या तत्परतेमुळे आरोपी पकडले गेले. पोलीस प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि शंका असल्यास तत्काळ पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. बाभुळगांवमधील ही चोरी स्थानिक समाजासाठी धडा ठरली आहे, कारण घरातील विश्वासावर आधारित मजुराने आईच्या मदतीने केलेली ही चोरी लग्नासाठी सुरक्षित ठेवलेले दागिने लंपास करणे या दोन्ही बाबींमुळे सामाजिक स्तरावर चर्चेचा विषय ठरली आहे.

## ढाणकीत रहस्यमय धडधडणारा आवाज

### नागरिक भयभीत, प्रशासनाकडेही नाही ठोस माहिती

प्रतिनिधी १० डिसेंबर

**ढाणकी :** ढाणकीत काल सकाळी पुन्हा एकदा अचानकपणे जमिनीतून धडधडणारा आवाज ऐकू आल्याने नागरिकांनी घाबरून घराबाहेर धाव घेतली. सकाळी 9.17 वाजता जाणवलेल्या या धक्क्यामुळे घरांच्या टिनपत्र्यांना आणि भांड्यांना कंप जाणवल्याची माहिती स्थानिकांनी दिली. या घटनेची चर्चा शहरातच नव्हे तर समाजमाध्यमांवरही दिवसभर रंगली.

याआधीही ढाणकीमध्ये अशाच प्रकारचे आवाज आणि कम्पने जाणवल्याचे नागरिक सांगतात. मात्र प्रशासनाकडे अद्याप या घटनांचे कोणतेही स्पष्ट कारण उपलब्ध नाही. आवाजाबाबत विद्युत विभाग, पोलिस, महसूल अशा विविध खात्यांकडून चौकशी करण्यात आली असता कुणीही ठोस माहिती देऊ शकले नाही.

ढाणकीपासून काही किमी अंतरावर असलेल्या गिट्टी खदानीत होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे आवाज येतो का, याबाबत नागरिकांनी चौकशी केली. मात्र ब्लास्टिंग चालक व खदान मालकांनी ढाणकीपर्यंत असा आवाज पोहोचणे अशक्य असल्याचे सांगितले. त्यामुळे आवाजाचे रहस्य आणखी गडद झाले आहे.

काही ज्येष्ठ नागरिकांचा अंदाज आहे की ढाणकी परिसरात पूर्वी दगडी कोळशाच्या खाणी असल्याने भूमिगत पोकळींमध्ये नैसर्गिक हलचाली होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शहरात भूकंप मापक यंत्र बसविण्याची मागणी जोर धरत आहे. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

तहसीलदार राजू सुरडकर यांनी काही विद्युत रोहित्रांवर स्पार्किंग झाल्याची प्राथमिक माहिती मिळाल्याचे सांगितले असून तपास सुरू असल्याचेही स्पष्ट केले.

तर विद्युत विभागाचे अभियंता मारोती आत्राम यांनी ढाणकीत कोणतीही विद्युत बिघाड किंवा स्पार्किंग झाल्याचे नोंद नसल्याचे स्पष्ट केले.

ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनीही आवाजाचे कारण शोधण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगून नागरिकांनी शांतता आणि सतर्कता ठेवावी, असे आवाहन केले. रहस्यमय आवाजाचे खरे कारण शोधण्यासाठी प्रशासन कोणती पावले उचलते, याकडे संपूर्ण ढाणकीचे लक्ष लागले आहे.

## ग्रामसेवकाची तात्काळ बदली करा, ग्रामस्थांचे बीडीओंना निवदेन

प्रतिनिधी १० डिसेंबर

**उमरखेड :** तालुक्यातील बाळदी ग्रामपंचायतीतील कारभार सतत दिरंगाईत टाकणाऱ्या ग्रामसेवकाच्या तात्काळ बदलीची मागणी ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. आगामी निवडणुका पारदर्शक पार पाडण्यासाठी ही कारवाई आवश्यक असल्याचेही ग्रामस्थांनी स्पष्ट केले.

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की बाळदीचे ग्रामसेवक डी. बी. सूर्यवंशी हे गेल्या चार पाच



वर्षांपासून बाळदीसह आणखी एका गावाचा कार्यभार पाहत आहेत. दुहेरी जबाबदारीमुळे ते बाळदीमध्ये नियमित हजेरी लावत नाहीत. त्यामुळे नागरिकांची कामे वेळेत होत नाहीत, अनेक समस्या प्रलंबित राहतात. कार्यालयात आलेल्या नागरिकांशी ते अरेरावीने बोलतात, तर अनेकवेळा ते कार्यालयात उपलब्धही नसतात, अशा तक्रारी निवेदनात मांडण्यात आल्या आहेत. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विद्यमान ग्रामसेवकांचे काही राजकीय नेत्यांशी असलेले सलोख्याचे संबंध निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करू शकतात, असा आरोप ग्रामस्थांनी केला. त्यामुळे निवडणुका होईपर्यंत सदर ग्रामसेवकांना हलवून त्यांच्या जागी कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसलेला ग्रामसेवक नेमण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. निवेदन देताना नितीन राठोड, प्रफुल वानखेडे, प्रवीण इंगळे, रामराव ठाकरे, रामदास पोटे, संदीप हटकर, आदेश बेळतकर, गजानन राठोड, प्रवीण चिरडे, सत्यपाल पोपुलवाड आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## बांधकाम कामगारांच्या नोंदणी प्रक्रियेत अडथळे

प्रतिनिधी १० डिसेंबर

### मध्यस्थांकडून अतिरिक्त पैसे आकारल्याची चर्चा

**दिग्रस :** इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी योजनेत नोंदणी करण्यासाठी बांधकाम कामगारांना अद्यापही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नोंदणीसाठी लागणारी आवश्यक शासकीय कागदपत्रे, ९० दिवसांच्या कामाचे प्रमाणपत्र आणि अधिकृत अधिकारी यांची सही-शिक्का या प्रक्रियेमुळे कामगारांची गती मंदावते.

अनेकांना कामाच्या ठिकाणाहून वेळ काढणे कठीण जात असल्याने नोंदणी होणे लांबणीवर पडते.

या परिस्थितीचा फायदा घेत शहरात काही तथाकथित मध्यस्थ सक्रिय झाल्याची चर्चा आहे. नोंदणी प्रक्रियेत मदत करण्याच्या नावाखाली १,००० ते २,००० रुपये, तर शैक्षणिक लाभांसाठीच्या अर्जात त्याहूनही अधिक रक्कम आकारली जात असल्याचे कामगारांकडून सांगितले जाते. शासनाच्या पूर्णपणे मोफत असलेल्या या योजनेत मध्यस्थांच्या हस्तक्षेपामुळे कामगारांना आर्थिक फटका बसत आहे.

अधिकृत ऑनलाइन केंद्रांवर अत्यल्प शुल्कात (सुमारे १०० रुपये) अर्जाची प्रक्रिया उपलब्ध असतानाही अनावश्यक खर्च करावा लागत असल्याची खंत अनेक लाभार्थ्यांनी व्यक्त केली आहे. नोंदणी प्रक्रिया पारदर्शक आणि सुलभ व्हावी, तसेच मध्यस्थांच्या अवांछित हस्तक्षेपावर नियंत्रण आणावे, अशी मागणी कामगारवर्गातून होत आहे.

स्थानिक प्रशासन या तक्रारींची दखल घेऊन नोंदणी प्रक्रियेबाबत मार्गदर्शन, जनजागृती आणि कडक कारवाई करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गुन्हेगार १ वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार

प्रतिनिधी १० डिसेंबर

**यवतमाळ :** यवतमाळ - बोदड रोड चौसाळा रहिवासी भावेश उर्फ गोलू तिवारी (वय 30) यास यवतमाळ पोलिसांनी 1 वर्षासाठी जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार केले. भावेश याच्याविरुद्ध 2015 पासून विविध गुन्ह्यांची नोंद असून, त्याच्या वर्तनात सुधारणा न झाल्यामुळे पोलिसांनी कठोर कारवाई केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित चौधरी यांनी हद्दपारीचा प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकारी यवतमाळ कडे पाठविला, त्यानंतर दिनांक 05/12/2025 रोजी



आदेश मिळाला. पोलिसांनी 09/12/2025 रोजी त्यास ताब्यात घेत हद्दपार आदेश ताब्यात आणला. बोदड व वाघापुर परिसरात शांती व सुव्यवस्था अबाधीत राहावी यासाठी माननीय पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने मार्गदर्शन केले. लोहारा पोलीस स्टेशनचे ठाणेदार रोहित चौधरी व टीमने प्रभावी कारवाई करून नागरिकांमध्ये कायद्याची वचक निर्माण केली.

सदर कारवाईत पोलीस स्टेशन लोहारा चे पोउपनि गजानन अजमीरे, मपोना रजनी गेडाम, पोहवा अमोल अन्नेरवार, नकुल रोडे, पवन चिरडे, बब्लू पठाण, प्रशांत राठोड, रितेश मस्के यांनी सहभाग घेतला.

## दुचाकी अपघात; एक जण ठार

प्रतिनिधी १० डिसेंबर

**आर्णी :** शहरापासून पाच किमी अंतरावर असलेल्या पिंपळनेर फाट्याजवळ दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी रात्री ८:३० वाजता घडली. बाबुलाल हजारी पवार (४०) रा. अंतरगाव असे मृताचे नाव आहे. ते सुकळी येथून अंतरगावकडे जात असताना पिंपळनेर फाट्याजवळ दुचाकी स्लिप झाली. यात बाबुलाल पवार गंभीर जखमी झाले त्यांना आर्णी ग्रामीण रुग्णालयात उपचारसाठी नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. घटनेचा अधिक तपास ठाणेदार नीलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

## ग्रामपंचायतीच्या भोंगळ कारभारावर गावकऱ्यांची टीका; आमसभेत गोंधळ

### सभेला गावातील २०० हून अधिक नागरिकांची उपस्थिती

प्रतिनिधी १० डिसेंबर

**पारवा :** पारवा ग्रामपंचायतीच्या कारभारावर वाढत्या नाराजगीचे प्रतिबिंब रविवारी झालेल्या आमसभेत स्पष्टपणे दिसून आले. दुपारी 1 वाजता आयोजित या सभेला गावातील 200 हून अधिक तरुणांसह नागरिकांनी उपस्थिती दर्शवली. सरपंच, उपसरपंच, सचिव तसेच पंचायत समिती घाटंजीचे प्रमुख विस्तार अधिकारी सोलंकी हे उपस्थित होते.

मागील दोन वर्षांच्या कामकाजाचा आढावा सादर करण्यात आला. मात्र ग्रामपंचायतीकडून ठोस माहिती न दिल्याने ग्रामस्थांनी आक्षेप घेतला आणि सभेत क्षणात गोंधळ निर्माण झाला. विकासकामांसाठी आलेला निधी, त्यावरील खर्च, कोणत्या योजनांतून कोणती कामे झाली याचा स्पष्ट हिशेब समोर न आल्याने तरुणांनी संताप व्यक्त केला.

आठवडी बाजारातील महसुलाचा हिशेब , दुकान व गाळे भाडे वसुलीतील अनियमितता, मनरेगा कामांचा लेखाजोखा, विहिरींच्या कामांवरील खर्च, घरकुल योजनेतील प्रलंबित प्रकरणे या संदर्भात सरपंच व सचिवांकडून कोणत्याही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर न मिळाल्याने वातावरण तंग झाले. सभासदांपैकी काहींनीही सद्य कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली असून, राजीनामा देण्याच्या तयारीत असल्याची चर्चाही रंगली.

स्थिती चिघळू नये म्हणून पदाधिकाऱ्यांनी "थोडा वेळ द्या" असे सांगत सभा गडबडीने आवरली; मात्र ग्रामस्थांमधील असंतोष कायम आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि. १० डिसेंबर २०२५



## न.प.निवडणुकीत...

# पुन्हा आज कोण माघार घेणार, लढतीचे चित्र स्पष्ट होणार !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम नगर पालिकेची निवडणूक पुढे ढकल्याने १० दिवस निवडणुकीचे वातावरण थंड पडले होते. जिकडे तिकडे शांतताच पसरली होती. पुन्हा आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. त्यामुळे कोण माघार घेणार यावर लढतीचे चित्र स्पष्ट होणार आहे. अनेकांनी वेळेवर पक्षाचे एबीफार्म लावून पक्ष बदलला तर अनेकांनी अपक्षही अर्ज भरला. काही ठिकाणी आघाडीत बिघाडी झाली. युतीसोबतही साथी नाहीत. तिकीट कापल्याने अनेकांनी या पक्षातून त्या पक्षात उडी मारली. पाडापाडीच्या राजकारणात कुरघोडी सुरू आहे. निवडणुकीत अनेकांनी सत्तेसाठी विचारधारा बदलली असून न.प. निवडणुकीचा सारीपाटच बदलला आहे. विजयाचे अतंर पार करण्यासाठी अनेकांनी पक्षांतर केले आहे. आता कोणत्या राजकीय नेत्यांनी नेम साधला असून कोण कोणाचा गेम करणार आहे. याकडे लक्ष लागले आहे. जातीय धृवीकरण साधण्यासाठी अनेक पक्षांनी जातीय समिकरणाच्या आधारे उमेदवाऱ्या दिल्या. निष्ठावंत कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले. त्यामुळे पक्षाअंतर्गत गटबाजी वाढली आहे. सर्वच पक्षाचे गटातटात विभाजन झाले. त्यामुळे विजयाचे नियोजन बिघडणार आहे. आपल्या सोबत राहणारा आपल्याच पक्षातील इतर पक्षात गेल्याने एकमेकांच्या विरोधात लढावे लागत आहे. या गटबाजीचा कोणाला फटका बसणार याकडे लक्ष लागले आहे.




## उद्या पासून प्रचाराच्या रणधुमाळीला सुरूवात



## दुहेरी - तिहेरी लढत, कोण घेणार बढत...

गुलाबी थंडीत वाशीम नगर पालिका निवडणुकीचे थंड पडलेले वातावरण चांगलेच तपायला सुरूवात झाली. दुसरीकडे निवडणूक रद्द झाल्याच्या पत्राने खळबळ उडाली. तर जिल्ह्यातील निवडणुकीतील राजकीय वातावरण ढवळून निघत असतांना वरवर ऐकेरी दुहेरी वाटणार लढत तिहेरी होत आहे . तर अनेक ठिकाणी काट्याची टक्कर होणार असून कोणाला चक्कर येणार आहे. हे तीन तारखेला कळणार आहे. वाशीममध्ये उबाठा शिवसेनेच्या रेखा सुरेश मापारी, भाजपाचे अनिल केंद, आमआदमी पार्टीचे सागर कोकास, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे संदिप दहात्रे, वंचितचे वैभव उल्लेमाले हे मैदानात उतरले आहेत.

पुरोगामी मनविणाऱ्या महाराष्ट्रात आजही सत्तेची समिकरणे जाती-जमातीच्या खुंट्याला बांधल्या गेली आहे. सत्तेच्या सारीपाटावर विशेषत: निवडणुकीच्या संदर्भात कास्ट फॅक्टर हा महत्वाचा समजल्या जातो, विकासाचे मुद्दे केव्हाचे हद्दपार झाले आहेत. जातीच्या आधारेच उमेदवाऱ्या दिल्या जात आहेत. त्यानुसार खेळीही राजकीय पक्ष खेळत आहेत.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांच्यात थेट संघर्षासोबतच आघाडीची बिघाडी झाली. महायुतीची घडी बिघडली. युतीतीलही साथी सोबत नाही. सर्वच पक्षात गटातटात विभाजन झाले. त्या विभाजनामुळे विजयाचे नियोजन बिघडले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अनेकांनी या पक्षातून त्या पक्षात उड्या मारल्या. तर अनेकांना उमेदवारी न मिळाल्याने अपक्ष रिंगणात उतरले आहेत. अनेक उमेदवार पक्ष बदलत असतांना सत्तेसाठी नितीमत्ता गहान ठेवत असल्याचे चित्र निर्माण झाले होते. राजकारणात सत्ता महान असून या निवडणुकीत पुन्हा एकदा जातीय समिकरणच समोर येतांना दिसत आहे. विकासाचे मुद्दे हद्दपार झाले आहे, शहर भकास झाले आहे. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा या समिकरणावर राजकारण सुरू आहे.

सत्तेसाठी मात्र, तडजोडीतून कुरघोडी करतांना उमेदवार दिसत आहे. जागा वाटपावरून निवडणुकीच्या खऱ्या रणसंग्रामाला सुरूवात झाली आहे. श्रेयवादाच्या व कुरघोडीच्या राजकारणात खऱ्या कार्यकर्त्यांचा मात्र, बळी दिल्या जात असल्याचे चित्र सर्वच पक्षात निर्माण झाले आहे.




## थोडक्यात

### गट-ब अराजपत्रित संयुक्त सेवा पूर्व परीक्षा नियोजन बैठक



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट-ब अराजपत्रित संयुक्त सेवा पूर्व परीक्षा सुरळीत, पारदर्शक व सुरक्षित वातावरणात पार पडावी, यासाठी आवश्यक नियोजनाच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीत विशेषतः परीक्षा उपकेंद्रांचे प्राचार्य व मुख्याध्यापकांकडून केंद्रस्तरावरील सुविधा, सुरक्षा व्यवस्था, निरीक्षक नियोजन, वाहतूक व्यवस्था, वैद्यकीय सहाय्य, सीसीटीव्ही देखरेख व परीक्षेतील शिस्त राखण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी पाटील म्हणाले की, परीक्षार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये याची विशेष काळजी घेण्यात यावी. सर्व विभागांनी समन्वय ठेवून जबाबदारीने व नियमबद्ध पद्धतीने परीक्षा व्यवस्थापन करणे अत्यावश्यक आहे. बैठकीस शिक्षण विभागाचे अधिकारी, पोलीस विभाग, वाहतूक विभागाचे अधिकारी तसेच सर्व परीक्षा केंद्र प्रमुख व उपकेंद्र प्रमुख उपस्थित होते.

### मानोरा तालुक्यात वृक्षांची कत्तल

प्रशासन 'कोमात' तर तस्कर 'जोमात'



● सिटी न्युज ब्युरो @ मानोरा ●

तालुक्यातील सह अनेक गावातील आडजात झाडे वनतस्कर शेतकऱ्यांच्या धुर्यावरील विकत घेऊन विना परवानगी हिरवी कच्च झाडाची राजरोस पणे कत्तली सुरू असून याकडे वन विभागाचे अधिकारी वनपाल व वनरक्षक चिरीमिरी घेऊन याकडे दुर्लक्ष करतात.

एकी कडे शासन वृक्षारोपण करीत असताना मानोरा परिसरात दररोज शेकडो वृक्षांची कत्तल होत असून दिवसा वृक्षांची कत्तल केल्या नंतर वाहनात लाकडे टाकून नेत असताना सुद्धा ह्या तस्करकडे कोणत्या अधिकाऱ्याचे लक्ष का नाही गेल्या तीन चार महिन्या पासून वृक्षांची कत्तल होत असताना तस्करवर कारवाई होत नसल्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण झाडेच नामशेष होण्याची भीती निसर्ग प्रेमी कडून होत आहे काही जागरूक नागरिकांनी भ्रमणध्वनी वरून अधिकारी कर्मचारी यांना माहिती दिली.

## युतीची मंदाविली गती, आपसाथ लढतात साथी, कार्यकर्त्यांची माती...

# आघाडीत बिघाडी, राजकीय बिघडली 'घडी' !

## राजकारण्यांना नाही राहीली शरम, नेत्यांसह उमेदवारही झाले बेशरम, कार्यकर्त्यांना केले नरम

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

नगर पालिका निवडणुकीत राजकीय वातावरण बिघडले असून सामाजिक राजकीय शरम न बाळगता बेशरम झालेल्या राजकीय नेत्यांसह उमेदवारांनीही नितीमत्ता गहान ठेवून सत्ताच महान करत पक्ष बदलले आहेत. आणि पक्षांही वेळेवर उमेदवाऱ्या दिल्याने सच्चा कार्यकर्त्यांचे मरण झाले असून त्यांना नरम केले आहेत. त्यामुळे अशा बईमान राजकारण्यांसह उमेदवारांना धडा शिकविण्याची वेळ आली आहे. सच्चा कार्यकर्त्यांनी आता एकत्र येवून कुरघोडी करीत यांना घरचा रस्ता दाखविण्याची वेळ आली आहे.

कधी नव्हे तर नगर पालिकेच्या निवडणुकीत राजकीय वातावरण क्षणक्षणाला बदलल्या गेले. विचारधारा नितीमत्ता विकल्या जावू शकते. हे स्पष्ट झाले आहे. लाज शरम केव्हाच्या विकल्या गेल्या आहेत. या सर्वांमध्ये मात्र, सच्चा कार्यकर्ता सतरंज्या उचलू उचलू मेला आहे. पुरोग्रामी महाराष्ट्रात



आजही जातीय समिकरणाच्या आधारेच राजकारण होतांना दिसत आहे. विकासाचे मद्दे हद्दपार झाले असून ठेकेदार उमेदवार झाले आहेत. यावरही ज्यांची जात भारी त्यांनाच उमेदवारी देण्यात आली आहे. ज्या मतदार संघात ज्या समाजाचे मतदान जास्त आहे. त्या समाजाच्या उमेदवाराला उमेदवारी देण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष पुढाकार घेतला. मात्र, जो इमाने इतबारे पक्षाचे काम करून समाजसेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांना मात्र, वाऱ्यावर सोडल्या जात आहे. त्यामुळे जातीय समिकरणाचे धोरण अवलंबल्यामुळे खऱ्या कार्यकर्त्यांचे मरण होत आहे.असे राजकीय धोरण बदलण्याची मागणी खऱ्या कार्यकर्त्यांकडून होत आहे. राजकीय पक्षांकडून वर्षानूवर्षे इमानदारीने काम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलण्यात आले. त्यामुळे त्या कार्यकर्त्यांनी आता काय आयुष्यभर सतरंजा उचलायचे काम करायचे काय असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला आहे. पक्षनिष्ठा गहान ठेवून नेते या पक्षातून त्या पक्षात उड्या मारतात कार्यकर्त्यांचे मात्र मरण होत आहे.

## मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या ; अपघाताला आमंत्रण

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर शहरात मोठ्या प्रमाणात- मोकाट गुरांचा सुसाट असून भर रस्त्यामध्ये आपले बस्तान मांडत असून नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष असून मुख्याधिकारी मोकाट गुरांमुळे अपघाताला आमंत्रण असून मोकाट गुरांना दोरखंड बांधाल का असा सवाल शहरवासीय कडून होत आहे . शहरात मोकाट जनावरे सामुहिक रित्या रस्त्याच्या मधोमध बसल्यामुळे अनेक अपघात घडले आहे. जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिकेने पुढाकार घेवून जनावरांच्या मालकांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. या जनावरांसाठी कोंडवाड्याची सुविधा करावी. मंगरुळपीर शहरात ठिकठिकाणी मोकाट गुरांचा ठिय्या असून मोकाट गुरे भर रस्त्यावर बसने, रस्त्यावर वावरणे इत्यादी कारणां मुळे वाहतुकीस अडथळा येत असून किरकोळ अपघात घडत आहेत तसेच शहरात घाण होत आहे. त्यामुळे रहदारिस त्रास होत आहे.

## साधता संवाद, मिटला ६४ वर्षांचा वाद !

### जिल्हा न्यायालय, वाशीम येथे ऐतिहासिक समझोता

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हा न्यायालय, वाशिम येथे सुमारे ६४ वर्षांपासून प्रलंबित असलेला दिवाणी वाद आपसी सहमतीने निकाली काढण्यात आला. सन १९६१ पासून प्रलंबित असलेला दिवाणी दावा क्रमांक ३/१९६१ (नवीन क्रमांक दि.अ.क. ५०/२०१२) अनिल विरेंद्र श्रावणे व इतर ६ विरुद्ध ६ अंतरिक्ष पार्श्वनाथ महाराज संस्थान, शिरपूर हा नुकसानभरपाई संबंधीचा वाद होता.

सदर प्रकरण जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरीक्त सत्र न्यायाधीश जे. पी. झपाटे यांच्या न्यायालयात प्रलंबित होते. 'साधता संवाद, मिटतो वाद' या उक्तीने प्रेरणा घेऊन दोन्ही पक्षकारांनी समेटाचा मार्ग स्वीकारला. अपिलाची सुनावणी चालू असताना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश जे. पी. झपाटे यांनी दोन्ही पक्षांना संवादाद्वारे समझोत्यासाठी प्रवृत्त



केले. या प्रकरणात अपिलार्थी तर्फे ॲड. एस. जी. बाकलीवाल व ॲड. अनूप एस. बाकलीवाल तसेच उत्तरवादी तर्फे ॲड. राम जोशी व ॲड. आशिष गोलेच्छा यांनी पक्षकारांशी चर्चा करून समझोता घडवून आणण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. जवळपास ६४ वर्षे न्यायालयात लांबलेला वाद आपसी समझोत्याने निकाली निघाल्याने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुवमण्यम यांनी दोन्ही पक्षकारांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम यांनी सांगितले की, 'न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे संवाद व समझोत्याद्वारे मोठ्या प्रमाणात निकाली काढता येतात. लोक अदालतमध्ये अधिकाधिक प्रकरणे याच माध्यमातून सोडवावीत.' दीर्घकालीन वैमनस्याला पूर्णविराम देत दोन्ही पक्षांनी परस्पर सहकार्याचे उदाहरण ठेवले आहे, जे न्याय व्यवस्थेतील सकारात्मक बदलाचे प्रतीक ठरत आहे.

# रोपवाटीकाच गायब, वृक्षारोपण कुठे झाले साहेब !

## भ्रष्टाचाराची चतृःसुत्री, सर्वकाही कागदोपत्री

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रोजगार हमीच्या १०० कोटीच्या घोटाळ्यानंतरही मालेगाव तालुक्यातील घोटाळ्याचे सत्र थांबता थांबेना तालुक्यात रोजगार हमी अंतर्गत देण्यात आलेल्या रोपवाटीकाच कागदोपत्री असल्याचे सिध्द झाले आहे. रोपवाटीकेतील वृक्ष गायब असून त्यानंतर रोपवाटीकेतील वृक्षांवर राबविण्यात येणारी वृक्षारोपण योजना कुठे आहे साहेब असा प्रश्न पडला आहे. भ्रष्टाचारी दक्ष असले तरी त्यांनी काहीच न करता ४५ लक्ष रूपये काढल्याचा प्रकार समोर आला आहे.

वाशीम तालुक्यात कागदोपत्री रोपवाटीका व न झालेल्या वृक्षारोपणवर कोट्यवधीचा घोटाळा सिटी न्युज सुपरफास्टने उघड केला होता. आता मालेगाव तालुक्यात अस्तित्वात नसलेल्या चार रोपवाटिकांचे कुशलचे देयक काढण्यात आले असल्याचे माहिती आहे, सदर रोपवाटिका ह्या एसआयटी (विशेष चौकशी समिती) चौकशीत समाविष्ट होत्या, चौकशीने केलेल्या चौकशीमध्ये काही गंभीर बाबी समोर आल्याने सदर रोपवाटिकांचे देयक हे सन २०१८ पासून प्रलंबित होते, मात्र रोजगार हमी योजनेच्या घोटाळ्यात माहीर असलेल्या पंचायत समिती मालेगाव यांना यातूनही पर्याय काढून अस्तित्वात नसलेल्या व यासाठी चौकशीतगंभीर बाबी समोर आलेल्या रोपवाटिकांचे सुमारे ४५ लक्ष रुपये देयक काढले आहे, यामध्ये 'अर्ध्यात आम्ही अर्ध्यात तुम्ही' अशी डील झाल्याची माहिती समोर येत आहे, सदर डील ही रोहयो विभाग प.स.मालेगाव मधील 'दीपक' ने केल्याचे सिद्ध होत आहे, दीपक ने सदर प्रकरणात अर्थपूर्ण 'सावळा' गोंधळ घातल्याचे पुरावे सिटी



न्यूज कडे आहेत, याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण चौकशीचे आदेश देऊन सदर घोटाळा बाहेर काढावा आणि दीपक चे कॉल डिटेल्स काढावे व चौकशी मध्ये दोषी आढळून येणाऱ्या बिडीओ व सीडीओ यांना तत्काळ निंलबित करावे अशी जनतेतून मागणी होत आहे.

### वाशीमनंतर मालेगावच्या रोपवाटीका गायब...

मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने रोजगार हमी योजनेअंतर्गत वाशीम तालुक्यात १४ रोपवाटीका कागदोपत्री असल्याचे प्रकरण सिटी न्युज सुपरफास्टने २०२२ मध्ये वृत्त मालिका प्रकाशित करून उघड केले होते. या भ्रष्टअधिकाऱ्याने चौकशी मॅनेज केली होती. जिओ टॅगवर रोपवाटीकेत एकही वृक्ष नसल्याचे पुरावे सिटी न्युज सुपरफास्टकडे उपलब्ध आहे. त्यानंतर यामधील भ्रष्ट तांत्रीक अधिकाऱ्याला लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी लाच स्वीकारतांना अटक केली. यावरून रोपवाटीकेसह इतरही विभागात भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द झाले. मालेगाव तालुक्यातही रोपवाटीका गायब झाल्याचा प्रकार उघडकिस आला आहे .रोपवाटीकेतीच वृक्ष गायब झाल्याने वृक्षारोपण कुठे झाले साहेब असा सवाल नागरिक करीत आहेत.

# भाजपच्या बालेकिल्ल्याला वंचितचे हादरे !

वंचित बहुजन आघाडी

## सुखवस्तू परिसरात सुविधांचा अभाव...

शहरातील प्रभाग क्रमांक तीन हा उच्चवर्गीय नागरिकांचा प्रभाग म्हणून ओळखला जातो. हा प्रभाग जरी भाजपाचा बालेकिल्ला असला तरी काही वर्षापासून वंचित बहुजन सुद्धा या प्रभागात आपले वर्चस्व निर्माण केले आहे. २५ ते ३० हजार वस्ती असलेल्या या प्रभागात बहुतेक पक्की घरे आहेत, सुखवस्तू परिसर असला तरीही अद्याप अनेक मूलभूत सुविधांचा अभाव या प्रभागात पहावयास मिळतो. करदात्यांना या प्रभागात म्हणाव्या तशा सुविधा मिळत नाही. पण, कर वसुली येथे शत प्रतिशत असते.



इच्छूक उमेदवार



गीतांजली शेगोकार | बबलू जगताप | हरिष काळे | निलेश देव | डॉ. स्नेहा गोखले



प्रभाग क्र ३ ची सध्याची परिस्थिती
जिकडे तिकडे मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिग लागले आहेत. कचऱ्यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात.

२०१७ च्या निवडणुकीत या प्रभागात भाजपाचे दोन आणि वंचितचे दोन उमेदवार निवडून आले. त्यामध्ये वंचित बहुजन आघाडी तर्फे एडवोकेट धनश्री देव तसेच बबलू जगताप तर भारतीय जनता पार्टीतर्फे हरीश काळे व गीतांजली शेगोकार या निवडून आल्या. परंतु दुर्दैवाने कोरोना काळात एडवोकेट धनश्री देव यांचे निधन झाले, त्यामुळे त्यांच्या जागी त्यांचे पती निलेश देव तेवढ्याच हिरीरीने नागरिकांच्या समस्या सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न करताना दिसून येतात. बबलु जगताप यांनी वंचितला सोडचिठ्ठी देत भाजप मध्ये प्रवेश केला आहे.

या परिसरात जठारपेठ, खरप, उमरी रोड, मच्छिंद्र नगर, निबंध प्लॉट, गुप्ते रोड, प्रसाद कॉलनी, ज्योती नगर, राहुल नगर, बिर्ला कॉलनी, गड्डम प्लॉट आदी परिसर येतो, बिर्ला मंदिराजवळील उडान पुलाचे काम गेल्या आठ वर्षापासून रंगाळले आहे. तो निवडणुकीत कळीचा मुद्दा असेल. हा उड्डाणपुल सुरु होण्यापुर्वी त्याची दूरावस्था झाली आहे. अद्यापही रेंगाळले असल्याने नागरिकांना रेल्वे फाटकाच्या समस्येचा सामना करावा लागत आहे. या परिसरात जड वाहतुकीची समस्या मोठ्या प्रमाणात आहे जड वाहतुकीमुळे प्रभागात अनेकदा अपघात सुद्धा झाले आहेत तसेच जठार पेठ ते उमरी कडे जाणाऱ्या रस्त्यावर भाजी विक्रेत्यांचे अतिक्रमण ही सुद्धा मोठी डोकेदुखी झालेली आहे. अनेक नागरिकांची चार चाकी वाहने घरासमोर रस्त्यावर उभी करण्यात येतात त्यामुळे सुद्धा वाहतुकीची समस्या पाहावयास मिळते. परिसरातील नवीन बांधलेले सिमेंट रोड अल्पावधीत उखडले आहेत, त्यामुळे रस्त्यावरील खड्यांचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.

या परिसरातील मोठ्या नाल्याचे काम अद्यापही प्रलंबित आहे परिसरात सर्वत्र स्वच्छतेचा अभाव दिसून येत आहे नाल्यांवर धापे नाहीत सांडपाण्याचा प्रश्न परिसरात पहावयास मिळतो काही ठिकाणी लाईट आहेत तर काही ठिकाणी लाईट नसल्याचे दिसून येत आहे. समन्वय नसल्याने परिसरातील विकास रखडला आहे या परिसरातील बिर्ला कॉलनीचा प्रश्न सुद्धा अद्याप प्रलंबित आहे प्रभागातील समस्या पाहता नागरिक परत याच नगरसेवकांना रिपीट करणार की नवीन चेहऱ्यांना संधी देणार हे पाहणे उचित राहणार आहे.हा अकोला शहरातील प्रभाग क्रमांक तीन बद्दलचा तपशीलवार आढावा आहे. हा प्रभाग उच्चभ्रू वस्तीचा असला तरी, अनेक मूलभूत समस्यांनी ग्रासलेला आहे, असे तुमच्या माहितीवरून स्पष्ट होते. या प्रभागात निलेश देव आणि डॉ.स्नेहा गोखले हे इच्छूक उमेदवार आहेत.

> ◆जठारपेठ आणि न्यू तापडीया नगर प्रभाग क्रमांक तीन मध्ये यंदा नव्याने निघालेल्या आरक्षणानुसार अनुसूचित जाती महिलेसाठी अ भाग राखीव करण्यात आला आहे. महिलांसाठी या प्रभागात तीन जागा असून एक जागा ओबीसीसाठी आणि एक जागा सर्वसाधारण अर्थात खुल्या गटातील महिलेसाठी राखीव आहे. केवळ एक जागा पुरुषासाठी असून त्यावर सर्वांच्या उड्या असतील. कोणता सक्षम पुरुष उमेदवार या प्रभागात विजयी होतो याकडे सर्वांचे लक्ष असेल. प्रमुख परिसर जठारपेठ, उमरी रोड, मच्छिंद्र नगर, निबंधे प्लॉट, गुप्ते रोड, प्रसाद कॉलनी, ज्योती नगर, राहुल नगर, बिर्ला कॉलनी, गड्डम प्लॉट आणि बिर्ला मंदिर परिसर.
>
> ◆प्रभाग भाजप - वंचितचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. कोरोनात ॲड. धनश्री देव यांच्या निधनानंतर त्यांचे पती निलेश देव सक्रिय झाले. उच्चवर्गीय व सुखवस्तू परिसर असूनही, या प्रभागात अनेक समस्या आहे. बिर्ला मंदिराजवळील रेल्वे उड्डाणपुलाचे काम आठ वर्षांपासून प्रलंबित हजारो नागरिकांना रोजचा रेल्वे उड्डाणपुलाचा प्रश्न ठरतो आहे अडचणीचा. जठारपेठ ते उमरीकडे जाणाऱ्या रस्त्यावर भाजी विक्रेत्यांचे अतिक्रमण, स्ट्रिटलाईट्सचा अभाव, न्यू तापडीया नगर अप्रोच रोडवर खड्डेच खड्डे अशा विविध प्रकारच्या समस्या आहे.



प्रभाग क्र३ ची सध्याची परिस्थिती
तुंबलेल्या नाल्यामुळे या प्रभागात आरोग्य समस्या बिकट बनली आहे. नाल्यांची दैनंदिन सफाई होत नसल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

प्रभाग क्र. ३ व ४ मधील आर आर सी चा रणसंग्राम हा कार्यक्रम पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा



प्रभाग क्र३ ची सध्याची परिस्थिती
प्रभाग क्र. ३ मध्ये पाणी वाहून जाण्याची सोय नसल्यामुळे ठिक ठिकाणी गटार झालेली दिसतात. त्यामुळे रोगराईचा सामना सामान्य नागरिकांना करावा लागतो.

# गुडधी भागातील नागरिकांचा अपेक्षाभंग

हद्दवाढ झाल्याने शहरात समाविष्ट झाल्यानंतर विकासाची अपेक्षा असताना, गुडधी परिसरातील नागरिकांचा कसा अपेक्षाभंग झाला, हे स्पष्टपणे दिसून येते. अकोला शहराचा सीमा विस्तार झाल्यानंतर गुडधी परिसर शहरात समाविष्ट झाला. त्यानंतर २०१७ साली झालेल्या निवडणुकीत या प्रभागातून भाजपाचे चारही नगरसेवक मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. त्यामध्ये संतोष शेगोकार, अनुराधा नावकर, पल्लवी मोरे आणि मिलिंद राऊत यांचा समावेश होता. या प्रभागाची लोकसंख्या त्यावेळी २५००० एवढी होती.



सुरेखा वरोकार | बळीराम कपले | चारुलता मुळे | मिलींद इंगळे

महापालिकेत परिसराचा समावेश झाल्यानंतर या प्रभागाच्या विकासाला गती येईल, अशी नागरिकांची अपेक्षा होती. परंतु पाच वर्षातच या नागरिकांचा अपेक्षाभंग झाला. एक तर टॅक्स भरमसाठ वाढला आहे. तर पाणीपट्टी कर सुद्धा वाढविण्यात आला आहे .या परिसरात बाळापुर मतदार संघाचा सुद्धा काही भाग येतो. परिसरातील एका मोठ्या नाल्याचे बांधकाम करण्यात आले आहे. परिसरात पेयजलाची समस्या आहेत. गुडधी परिसरातील रस्त्यांचे खडीकरण रखडले आहे.

या परिसरात मागील पाच वर्षात बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्त्यांची अक्षरशः धूळधाण झाली आहे. जागोजागी रस्ता उघडून त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत. परिसरात स्वच्छतेचा अभाव असल्याने सर्वत्र घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे. उमरी ते गुडधी कडे जाणाऱ्या रस्त्यावर जड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणावर असल्याने नेहमीच अपघाताची धाकधूक नागरिकांच्या मनात असते. परिसरात घंटागाड्या नियमित येत नसल्याचा आरोप नागरिक करीत आहेत रस्त्यावर स्ट्रीट लाईट लावण्यात आले आहेत परंतु हे स्ट्रीट लाईट नेहमीच बंद असल्याने रात्रीच्या वेळेस रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य दिसून येते .

## विकासाची वाट गवसलीच नाही




◆परिसरात सर्वत्र मोकळया प्लॉटमध्ये तसेच रस्त्याच्या कडेला झाडे झुडपे वाढली आहेत. नव्याने डांबरीकरण केलेल्या रस्त्यावर बांधण्यात आलेले डिव्हायडर तुटून पडले आहेत. काही मोजक्याच गल्ल्यांचे कॉँक्रिटीकरण तसेच पेवर ब्लॉक लावण्यात आले आहेत.

◆उमरी ते गुडधि या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे जागोजागी मोठमोठे खड्डे पडल्याने व या रस्त्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणात येजा असल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन रस्त्याने ये जा करावे लागत आहे.

◆परिसरातील स्मशानभूमीची सुद्धा अत्यंत दुरावस्था झालेली आहे. नागरिकांनी मोठ्या विश्वासाने भाजपाचे चार नगरसेवक परिसरातून निवडून दिले परंतु त्यांच्या पदरी विकासाऐवजी भरमसाठ करवाढ तसेच पाणीपट्टी नशिबी आली आहे. त्यामुळे यंदा परिसरातील नागरिक भाजपालाच कौल देतात की अन्य पर्याय स्वीकारतात हे पाहणे योग्य ठरणार आहे.

◆अकोला महापालिकेतील प्रभाग क्रमांक चार अर्थात उमरी आणि गुडधी परिसर यातील अ भागात यंदाचे आरक्षणानुसार अनुसूचित जातीच्या उमेदवारासाठी हा भाग राखीव आहे. तर ब भागात महिलांसाठी राखीव असून यातून ओबीसी प्रवर्गातील महिला निवडणुक लढवेल. क भागातून सर्वसाधारण महिला इलेक्शन लढणार आहे. तर ड भाग हा सर्वसाधारण अर्थात या भागातून कोणी ही निवडणुक लढवू शकणार आहे.



प्रभाग क्र४ ची सध्याची परिस्थिती
गुडदी भागातील रस्त्याचे डांबर उखडल्यामुळे रस्ता उघडा पडला आहे. त्यामुळे वाहन चालकांची गेल्या कित्येक दिवसांपासून तारांबळ होत आहे.



प्रभाग क्र४ ची सध्याची परिस्थिती
प्रभाग क्र ४ मधील हा वर्दळीचा रस्ता डांबरीकरणाच्या प्रतिक्षेत आहे. नागरिकांनी या बाबत केलेल्या मागणीचा प्रशासनाला विसर पडलेला दिसतो.



प्रभाग क्र४ ची सध्याची परिस्थिती
अकोला येथील प्रभाग क्रमांक ४ मधून वाहणाऱ्या नाल्यांची सफाई झालेली नाही. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यांशी खेळ चाललेला दिसून येत आहे.



प्रभाग क्र४ ची सध्याची परिस्थिती
अकोला येथील प्रभाग क्रमांक ४ मधील नाल्याची दुरूस्ती वेळीच झालेली नाही त्यामुळे नाल्यातील पाणी अन्यत्र वाहते. रहिवाशांना त्याचा त्रास होतो.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135